ePaper
नेपाळनंतर आता पाकिस्तानचे सरकार कोसळणार? Gen-Z आंदोलक रस्त्यावर,
| वर्ष - 9 | अंक -75 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™



## आतील पानांत


- अष्टपैलूंची निर्णायक कामगिरी!
- रोहितने धवल कुलकर्णीसह केला प्रँक
- दिल्लीनंतर बिहारमध्येही केलं मतदान?
- “तुम्ही ‘धोका’ कसे म्हणू शकता?


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 7 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## जमिन घोटाळा प्रकरण: अजित पवारांना चहुबाजूने घेरलं

# मुलाच्या व्यवहाराने पिता अडचणीत!

## फडणवीस ‘गंभीर’, पार्थ पवार प्रकरणात कारवाई

| पुणे | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**पुण्यातील अतिउच्चभ्रू भागात, सुमारे ४० एकर सरकारी “महार वतन” जमीन केवळ ₹३०० कोटींमध्ये विकल्याच्या आरोपांनी राज्यातील राजकारणात खळबळ निर्माण केली आहे. या व्यवहाराशी उपमुख्यमंत्री अजीत पवार यांचे ज्येष्ठ सुपुत्र पार्थ पवार यांचा संबंध असलेल्या कंपनीचे नाव समोर आले आहे. आरोप आहेत की जमिनीचे बाजारभाव तब्बल ₹१८०० कोटी इतके आहेत, परंतु व्यवहार एवढ्या कमी किमतीत झाला.**



### आरोपांचा पाया

पार्थ पवार हे संचालक असलेल्या Amadea Holdings LLP या कंपनीने पुणे, कोरेगाव पार्क/मुंडवा परिसरातील जमीन खरेदी केली, असा आरोप आहे.ॉ व्यवहारात स्टॅम्प ड्युटी केवळ ₹५०० भरल्याची माहिती आहे, ज्यात साधारणत: कोट्यवधींचा खर्च होण्याची शक्यता होती.

व्यवहारानंतर दुर्मिळ दोन दिवसांतच स्टॅम्प-ड्युटी सवलत मंजूर करण्यात आल्याचे समोर आले आहे, ज्यामुळे “प्रक्रियात्मक वेग” व “पालकापाशी राजकीय हालबाजी” यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### उपाय आणि कारवाई

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाला “गंभीर” असे संबोधून चौकशीची अपेक्षा व्यक्त केली आहे.
पुणे जिल्ह्यातील तहसीलदार सूर्यकांत येवले यांचे निलंबन करण्यात आले असून, व्यवहारातील अनियमितता लक्षात घेऊन विस्तृत चौकशी समिती नेमली गेली आहे.
विरोधकांनी या प्रकरणावरून अजीत पवार यांच्याविरुद्ध राजीनाम्याची मागणी केली आहे.

### राजकीय वाद

विरोधी पक्षांचे नेते दावा करतात की, “सरकारी जमिनीची इतकी मोठी मालमत्ता अत्यल्प किमतीत खरेदी करून मोठा लाभ घेतला गेला आहे”.
शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) चे नेते म्हणतात की, “जर उपमुख्यमंत्री यांच्या चिरंजीवांकडून अशी मोठी गैरव्यवस्था घडती असेल, तर यावर पक्ष म्हणून भीषण भूमिका घेतली जाईल.”
अजित पवार यांनी या प्रकरणावर प्रथम प्रतिक्रिया देताना म्हटले आहे: “मला अद्याप सर्व माहिती मिळाली नाही. मुलगा सज्ञान झाला आहे. माझा या प्रकरणाशी दुरान्वय देखील नाही.”
पार्थ पवार यांनी माध्यमांशी संवादात सांगितले आहे की, “मी काही चुकीचे काम केलेले नाही, माझी कायदेशीर टीम हे स्पष्ट करेल.”

### कायदेशीर व आर्थिक उलगडा

जमीन व्यवहारात वापरलेल्या कंपनीचे मूळ भांडवल फक्त ₹१ लाख असल्याची माहिती आहे, परंतु ती ₹३०० कोटींच्या व्यवहारात सहभागी ठरली.
व्यवहार झालेल्या जमिनीची बाजारमूल्य साधारणतः ₹१८०० कोटी इतकी असल्याचा दावा आहे.
या सर्व माहितीच्या आधारे सरकारने महसूल विभाग, जमीन अभिलेख व नोंदणी विभाग यांची तपासणी सुरू केली आहे.

### सामाजिक व जनभावना

या प्रकरणामुळे पुण्यातील तसेच राज्याच्या राजकीय वातावरणात हलचल वाढली आहे. लोकसामान्यांनी असा विश्वास व्यक्त केला आहे की, या प्रकारचे व्यवहार “सामान्य नागरिकांसाठी पारदर्शकतेचा अभाव” दाखवतात. विरोधक याचा लाभ घेऊन पक्षघटनेचा मुद्दा उठवत आहेत.

### आता पुढे काय?

सरकारने विषयाची सखोल चौकशी करणारी कमिटी नेमली आहे, तपास निकालानंतर पुढील कारवाई होईल.
आरोपी भागीदारांविरुद्ध गुन्हा दाखल होऊ शकतो, हे संकेत विरोधकांकडून मिळाले आहेत. महाराष्ट्रातील “सरकारी जमीन व नोंदणी प्रक्रियेत सुधारणा” या दृष्टिकोनातून हे प्रकरण महत्त्वाचे ठरणार आहे.

## पार्थ पवारांच्या पिताश्रीच्या राजीनाम्यापर्यंत लढू - अंधारे

“या सगळ्या बातम्या बघून चक्रावून गेली आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांच्या चिरंजीवांकडूनच जर एवढी मोठी गोष्ट घडत असेल तर आत्ता आपण यावरती काय बोलायचं? 21 कोटींचा महसूल बुडवणे ही सरकारची फसवणूक आहे. गोरगरिबांनी सगळे कर भरायचे आणि उपमुख्यमंत्र्यांच्या चिरंजीवांना मोकाट सोडायचं हे वाईट आहे. पक्ष म्हणून आम्ही भूमिका घेऊ. आम्ही भूमिका घेऊ तेव्हा सळो की पळो करुन सोडू. पुण्यामध्ये असा प्रकार कोणीही सहन करणार नाही. शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) शेवटपर्यंत हा विषय घेऊन जाईल. गरज पडली तर ज्या चिरंजीवांनी हे केलंय त्यांच्या पिताश्रींचा राजीनामा घेण्यापर्यंत आम्हाला लढावं लागेल,” असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी म्हटलं आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि माजी विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी अजित पवारांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं आहे. “उपमुख्यमंत्री महोदयांचे सुपुत्र पार्थ पवार यांची अमेडिया ही कंपनी जिचे भांडवल अवघे 1 लाख रुपये आहे, या कंपनीला सुमारे 1800 कोटी बाजारमूल्य असलेल्या जमिनीची 300 कोटींना खरेदी करता आली. हा झोल आता अजित पवारांनी किंवा पार्थ पवारांनी महाराष्ट्राला सांगावं. गंमत तर पुढे आहे, एवढ्यावर हा प्रवास थांबला नाही तर या कंपनीने रियल इस्टेटचे भाव गगनाला असलेल्या कोरेगाव पार्क (पुणे) येथे चक्क आयटी पार्क आणि डेटा सेंटर उभारण्याची तयारीही चालवली. एक लाखाचे भांडवल असलेल्या कंपनीला हे कसे काय शक्य होते, (तेही

# जमिनीची खरेदी-विक्री कशी होते

## जमिनींच्या (विक्रीवर) कडक निर्बंध

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महार वतन म्हणजे ब्रिटिश काळात महार समाजाला शासनाची सेवा करण्याच्या बदल्यात वंशपरंपरागत पद्धतीने कसण्यासाठी दिलेली जमीन. या जमिनीवर वतनदारांचे हक्क आहेत. ही जमीन वतनदारांना कसता येते. पण, खरेदी – विक्री किंवा हस्तांतरण करता नाही. या जमिनी शासकीय सेवेच्या बदल्यात मिळालेल्या असल्यामुळे भोगवटदार वर्ग-२ मध्ये रूपांतरित झाल्या आहेत. या जमिनींच्या हस्तांतरणावर (विक्रीवर) कडक निर्बंध आहेत.**





### अन्य विक्रीवर निर्बंध नाहीत

जाते आहे, अशी शंकाही निर्माण होते. सरकारने जमीन व्यवहाराबाबत स्पष्टीकरण दिल्याशिवाय अजित पवार मंत्रिमंडळात असल्यामुळे पार्थ पवारांना लाभ देण्यात आला, असे म्हणता येणार नाही. जमीन गैरव्यवहार प्रकरणी परस्पर विरोधी, गोंधळ निर्माण करणारी माहिती समोर येत आहे. सरकारी जमीन असेल, तर ती विकता येत नाही. तहसीलदार म्हणतात, जमीन खरेदीच्या कागदपत्रांवर मी सही केलेली नाही.

त्या विकण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. महार वतनाच्या जमिनी वगळता अन्य वतनाच्या जमिनी सरकारने भोगवटदार वर्ग दोन मधून भोगवटदार वर्ग एकमध्ये रुपांतरित केल्या आहेत. त्यामुळे महार वतन वगळता अन्य जमिनींच्या खरेदी – विक्रीवर निर्बंध नाहीत.महार वतनाची जमिनी बिगर कृषी वापरासाठी विक्री करावयाची असल्यास चालू बाजारभावाच्या ५० टक्के रक्कम नजराणा म्हणून सरकारकडे भरावी लागते. जमिनीच्या मूल्यांकनासह अन्य कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने करता येते.पार्थ पवार राजकारणात नाहीत. जमीन व्यवहाराशी पार्थ पवार यांचा थेट संबंध नाही. जमीन खरेदी – विक्री व्यवहारात गोंधळ उडविणारी माहिती समोर येत आहे. जमिनीचा व्यवहार झाला की, नाही हेच कळत नाही. अजित पवार यांचा यात सहभाग आहे की, नाही हेही कळत नाही. त्यामुळे राज्य सरकारने जमीन व्यवहार नेमका कसा झाला आहे, याची माहिती जाहीर करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी केली.मुख्यमंत्र्यांकडून अजित पवारांना अडचणीत आणण्यासाठी हे केले जाते आहे, अशी शंकाही निर्माण होते. सरकारने जमीन व्यवहाराबाबत स्पष्टीकरण दिल्याशिवाय अजित पवार मंत्रिमंडळात असल्यामुळे पार्थ पवारांना लाभ देण्यात आला, असे म्हणता येणार नाही. जमीन गैरव्यवहार प्रकरणी परस्पर विरोधी, गोंधळ निर्माण करणारी माहिती समोर येत आहे. सरकारी जमीन असेल, तर ती विकता येत नाही. तहसीलदार म्हणतात, जमीन खरेदीच्या कागदपत्रांवर मी सही केलेली नाही. तहसीलदाराने सही न करता व्यवहार कसा होऊ शकतो. जो तहसीलदार मी सही केली नाही, हे सांगतो. त्यांचे निलंबन कसे होऊ शकते. त्याचे निलंबन मागे घ्या. राज्यात गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. त्यात जमीन खरेदी व्यवहाराची भर पडली आहे, त्यामुळे या गोंधळावर राज्य सरकारने अधिकृतपणे माहिती जाहीर करावी, अशी मागणीही सुळे यांनी केली.ल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. महार वतनाच्या जमिनी वगळता अन्य वतनाच्या जमिनी सरकारने भोगवटदार वर्ग दोन मधून भोगवटदार वर्ग एकमध्ये रुपांतरीत केल्या आहेत. त्यामुळे महार वतन वगळता अन्य जमिनींच्या खरेदी – विक्रीवर निर्बंध नाहीत.महार वतनाची जमिनी बिगर कृषी वापरासाठी विक्री करावयाची असल्यास चालू बाजारभावाच्या ५० टक्के रक्कम नजराणा म्हणून सरकारकडे भरावी लागते. जमिनीच्या मूल्यांकनासह अन्य कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने करता येते.पार्थ पवार राजकारणात नाहीत. जमीन व्यवहाराशी पार्थ पवार यांचा थेट संबंध नाही. जमीन खरेदी – विक्री व्यवहार गोंधळ उडविणारी माहिती समोर येत आहे. जमिनीचा व्यवहार झाला की, नाही हेच कळत नाही. अजित पवार यांचा यात सहभाग आहे की, नाही हेही कळत नाही.सरकारने जमीन व्यवहार नेमका कसा झाला आहे, याची माहिती जाहीर करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार) कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी केली.मुख्यमंत्र्यांकडून अजित पवारांना अडचणीत आणण्यासाठी हे केले.

# अजित पवारांचे पुत्र अडचणीत

## पुण्यातील जमीन व्यवहाराची चौकशी; अधिकाऱ्यांचे निलंबन

।पुणे।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्याशी संबंधित कंपनीने पुण्यात केलेल्या जमीन व्यवहाराची सारी माहिती मागविली आहे. या व्यवहाराच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. प्राथमिकदृष्ट्या हे प्रकरण गंभीर दिसते. काही चुकीचे झाल्याचे आढळल्यास कारवाई केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुलाच्या जमीन व्यवहाराशी आपला दुरान्वये संबंध नाही. नियमाच्या चौकटीत राहूनच काम करतो, असा दावा अजित पवारांनी केला.**



### प्रकरणात संबंध नाही – पवार

तसेच २० मे रोजी या व्यवहाराची नोंदणी करताना फक्त ५०० रुपये मुद्रांक वसूल करण्यात आला. प्रत्यक्षात या व्यवहारात २० कोटी रुपयांचा मुद्रांक भरणे आवश्यक होते. अजित पवारांच्या पुत्राच्या कंपनीसाठी साऱ्या सवलती देण्यात आल्याचा आरोप होत आहे.पुण्यातील जमीन व्यवहाराशी माझा दुरान्वयेही संबंध नाही. मी कोणाही अधिकाऱ्याला दूरध्वनी केलेला नाही, अशी भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मांडली. या पद्धतीचे काहीतरी सुरू असल्याचे तीन-चार महिन्यांपूर्वी माझ्या कानावर आले होते.

कोरेगाव पार्क येथील ४० एकर जागा गैरव्यवहार प्रकरणात मुद्रांक शुल्क बुडवून राज्य शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधित सर्वांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा निर्णय राज्याच्या मुद्रांक आणि नोंदणी शुल्क विभागाने घेतला आहे. या व्यवहारात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ संचालक असलेल्या अमेडिया कंपनीचा समावेश आहे. या कंपनीला देय मुद्रांक शुल्काची सहा कोटी रुपयांची रक्कम भरण्याबाबत नोटीसही बजाविण्यात आली असून, नियमानुसार मुद्रांक शुल्क न आकारल्याप्रकरणी सहदुय्यम निबंधकांचे तडकाफडकी निलंबन करण्यात आले आहे. प्रभारी नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक सुहास दिवसे यांनी सहनोंदणी महानिरीक्षक राजेंद्र मुठे यांच्या अध्यक्षतेखाली या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन केली असून, सात दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. महार वतनाच्या जमिनीची मूळ किंमत ही १८०० कोटी रुपयांची असताना ती ३०० कोटी रुपयांमध्ये विकण्यात आली.

मानववस्तीत बिबट्यांचा रहिवास | वन खात्याच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह; जुन्नर आणि परिसरासाठी

# स्पेशल लेपर्ड फोर्स तैनात करणार!

## मानव अन् बिबट्याचा संघर्षावर वनखात्याकडून प्रस्ताव; शासनाकडून हिरवा कंदील

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**जुन्नर तालुका आणि परिसरात मानव-बिबट संघर्षाला तब्बल पंचवीस वर्षे उलटली असली तरी या समस्येचा शेवट अद्याप दिसत नाही. दुसरीकडे गेल्या आठ दिवसांपासून शिरूर आणि आंबेगाव तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यामुळे परिसरात मोठी घबराट पसरली आहे. दोनवेळा लोकांच्या हल्ल्यात मृत्यू झाला असून, या प्रकारामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे.**



### बिबट्यांना मारून प्रश्न सुटणार का? पर्यावरण प्रेमींचा सवाल

बिबट्याच्या हल्ल्याची तीव्रता इतकी वाढली की, स्थानिक नागरिकांना जीवाची चिंता लागली आहे. या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी जुन्नर आणि परिसरात स्पेशल लेपर्ड फोर्स तैनात केली जाणार आहे. याबाबत शासनाकडे वनखात्याकडून प्रस्ताव ठेवण्यात आला होता त्याला शासनाने हिरवा कंदील दिला असल्याची माहिती बीएफओ प्रशांत खाडे यांनी दिली.

गेली आठ दिवस जुन्नर आंबेगाव आणि शिरूर परिसर मानव आणि बिबट्याच्या संघर्षात चर्चेत आला आहे. या परिसरातील ऊस क्षेत्र आणि यामध्ये बिबट्याचा रहिवास हा या संघर्षाचे मूळ कारण आहे. दुसरीकडे बिबट्याचा जंगल अधिवास मानवाने अतिक्रमित केल्यामुळे बिबटे मानव वस्तीत येत असल्याचा दावा पर्यावरण प्रेमी करीत आहेत. आता बिबट्या जुन्नर आंबेगावची सीमा ओलांडून राजगुरुनगरपर्यंत आला असून गेल्या दोन दिवसात राजगुरुनगर परिसरातही बिबट्याचे दर्शन झाल्याने नागरिकांमध्ये मोठी घबराट आहे. याबाबत वन खात्याने मात्र नागरिकांनी चिंता करण्याचे कारण नाही.वनखात्याच्या वतीने यासाठी खबरदारी आणि उपाययोजना केल्या जात असल्याचे सांगण्यात आले आहे.

> नरभक्षक बिबट्याच मारण्यात आला का याबद्दल शंका उपस्थित करण्यात आली आहे. मात्र यामध्ये शंका घेण्यासारखे कारण नाही. वन खात्यावर विश्वास ठेवणे गरजेचे आहे. वनखाते, वनाधिकारी, रेस्क्यू टीम तसेच स्थानिक नागरिकांमार्फत रेकी करूनच संबंधित नरभक्षक बिबट्याला मारण्यात आले आहे. यामध्ये कोणत्याही इतर बिबट्याला दगा झालेला नाही. नरभक्षक बिबट्याच्या पायाचे ठसे आणि मारण्यात आलेल्या बिबट्याच्या पायाचे ठसे मॅच करण्यात आले आहेत. त्यामुळे शंका घेण्यासारखे कारण नाही
>
> **-प्रश्नांत खाडे,** बीएफओ

**मानव बिबट 25 वर्षांचा संघर्ष!**

मागील 25 वर्षांचा विचार केल्यास २००१ पासून १० ऑक्टोबर २०२५ पर्यंत जुन्नर वनविभागाच्या हद्दीत म्हणजे जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यांमध्ये बिबट हल्ल्यांमध्ये ५४ जणांचा मृत्यू झाला असून, सुमारे १५४ नागरिक जखमी झाले आहेत. त्यापैकी अनेकांना आयुष्यभरासाठी अपंगत्व आले आहे. सुमारे २६ हजार ७६० पशुधनांचा बळी बिबट्यांनी घेतला आहे.

याबाबत बीएफओ प्रशांत खाडे म्हणाले, जुन्नर आंबेगाव शिरूर परिसर बिबट मुक्त करण्याचा वनखात्याचा प्रयत्न असणार आहे. बिबट्या त्यांच्या जंगल अधिवासात सुरक्षित राहिल याकडे वनखाते लक्ष देईल. बेस कॅम्प संख्या जास्तीत जास्त वाढविणार आहोत. त्या प्रमाणात मनुष्यबळ देखील वनखात्याच्या माध्यमातून या ठिकाणी देण्यात येईल. स्पेशल लेपर्ड फोर्स तैनात करण्यात येणार आहे. याबाबत शासनाकडे मागणी करण्यात आली असून शासनाकडून हिरवा कंदील देखील देण्यात आला आहे.

# अवैध बांधकामे रोखण्यासाठी स्थळ पाहणीनंतरच परवानगी

## फक्त कागदपत्रे पाहून मंजुरी नाही : पीएमआरडीएचा निर्णय

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हद्दीतील बांधकाम परवानग्यांवर आता काटेकोरपणे लक्ष ठेवले जाणार आहे. बांधकाम मंजुरीसाठी अर्ज केलेल्या स्थळांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतरच बांधकाम परवानगी द्यायची की नाही याचा निर्णय प्रशासन घेणार आहे. यासाठी सहाय्यक नगर रचनाकार प्रत्यक्ष स्थळ पाहणी आणि तपासणी करणार आहेत. यामुळे अनाधिकृत बांधकामांना लगाम बसेल असा दावा प्रशासनाने केला आहे.**



> बांधकाम मंजुरी देताना स्थळ पाहणी पूर्वीपासूनच बंधनकारक आहे. पूर्वी केवळ एका ओळीत परवानगी दिली जात होती. आता स्थळपाहणी करून संबंधित बांधकाम नियमानुसार पूर्ण झाले आहे का?, परिसरात आवश्यक जागा सोडली आहे का? या सर्व बाबींची तपासणी करूनच मंजुरी दिली जाईल.
>
> **- अविनाश पाटील,**
> संचालक, विकास परवानगी व नियोजन विभाग. 'पीएमआरडीए'

गेल्या काही दिवसांपासून वाघोली, हिंजवडी परिसर महानगर क्षेत्रातील बांधकामाबाबत अनेक तक्रारी पीएमआरडीएकडे दाखल करण्यात आल्या होत्या. यामध्ये बांधकाम व्यावसायिकांनी नियमानुसार कामे न करता नागरिकांची फसवणूक केल्याच्या तक्रारींचा समावेश अधिक प्रमाणात होता. त्यामुळे या प्रकारांबाबत कारवाई आता सुरू झाली आहे. मात्र यापुढे असे प्रकार घडू नये नागरिकांची फसवणूक होऊ नये . यासाठी पीएमआरडीए प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. पूर्वी बांधकाम मंजुरी घेताना पीएमआरडीएला केवळ दोन ओळींचे पत्र दिले जात होते. त्या आधारे आर्किटेक्टला मंजुरी देण्यात येत होती. शिवाय बांधकाम नियमानुसार असल्याचा उल्लेख करून परवानगी दिली जायची. प्रत्यक्ष स्थळ पाहणी मात्र केली जात नव्हती. अशा प्रकारे मंजुरी दिली जात असल्याने अनियमित बांधकामांना पेव फुटले हे प्रशासनाच्या लक्षात आल्यानंतर नागरिकांच्याही तक्रारी येऊ लागल्या होत्या. त्यामुळे आता नियमावली लागू करण्यात आली आहे. बांधकाम परवानगीसाठी अर्ज आल्यानंतर आता प्रत्यक्ष स्थळ तपासणीची सक्ती करण्यात आली आहे. यात प्रामुख्याने सर्व नियमांची पूर्तता झाली किंवा नाही हे पाहण्यात येईल त्यानंतरच परवानगी दिली जाईल. अशा प्रकारे पाहणी वेळी काही त्रुटी आढळल्यास त्या दुरुस्त करण्यास सांगितले जाणार आहे. नियमबाह्य काम झाल्यास संबंधितावर कारवाई केली जाणार असल्याचे पीएमआरडीए प्रशासनाने स्पष्ट केले आहे

### परवानगीसाठी येणारे प्रस्ताव

-बांधकाम व विकास परवानगी
-विकास हक्क हस्तांतरण
-भोगवटा प्रमाणपत्र
-जोते तपासणी प्रमाणपत्र
-विकास परवानगी व प्रारंभप्रमाणपत्र
-तात्पुरती आणि अंतिम रेखांकन परवानगी
-पायाभूत सुविधा आणि विकास योजना



**आठवड्याला सरासरी ५० प्रस्ताव**

'पीएमआरडीए'च्या विकास व परवानगी विभागात आठवड्याला विविध परवानगीसाठी सुमारे ५० प्रस्ताव दाखल होत आहेत. त्याची तपासणी करून रीतसर परवानगी दिली जात आहे. शिवाय, अतिक्रमण विभागाशी समन्वय साधून कामांबाबत कार्यवाही केली जात आहे.आतापर्यंत बांधकाम व्यावसायिकांना 'पीएमआरडीए'च्या आकुर्डी कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत होत्या. आता हा त्रास कमी होणार आहे. क्षेत्रीय कार्यालयांमधूनच बांधकाम




# पन्नू, निज्जरविषयी खुलासे करावेतच

**कॅनडात खलिस्तानवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येवरून त्या देशाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी भारताला बदनाम करून अडचणीत आणण्याचे हरतऱ्हेने प्रयत्न केले, पण त्यांना यश आले नाही.**

'कॅनडाच्या भूमीवर कॅनेडियन नागरिकाची हत्या' या वरकरणी न्याय्य वाटणाऱ्या तक्रारीलाही त्यांना कोणत्याही स्वरूपाचे कायदेशीर वा नैतिक अधिष्ठान देता आले नाही. याचे कारण कॅनेडियन सरकार वा तपासयंत्रणांनी आरोपाच्या पुष्ट्यर्थ कोणतेही ठोस पुरावे सादर केले नाहीत. शीख विभाजनवाद्यांच्या समर्थनामागे असलेले ट्रुडो यांचे मतपेढीचे राजकारण लपून राहिले नाही. त्यामुळे जितका संशय कॅनेडियन मंडळींनी भारताविषयी व्यक्त केला, तितकाच तो कॅनडाच्या हेतूंविषयी निर्माण झाला. सबब, आज दोन्ही देशांतील राजनैतिक संबंध गोठलेल्या अवस्थेत आहेत. कटुता टोकाला गेलेली आहे. या परिप्रेक्ष्यात अमेरिकेमध्ये अशाच एका खलिस्तानवाद्याच्या हत्येचा प्रयत्न आणि त्यात भारतीयांच्या कथित सहभागावरून निर्माण झालेल्या वादाकडे पाहावे लागेल. हरपतवंतसिंग पन्नू हादेखील निज्जरप्रमाणेच उच्चकोटीतला भारतद्वेष्टा.भारतातून पळून गेलेल्या अनेक खलिस्तानी मानसिकतेच्या शिखाप्रमाणेच हादेखील कॅनडा, अमेरिका अशा 'उदारमतवादी'



देशांच्या राजाश्रयाचा लाभार्थी. त्याच्या हत्येचा प्रयत्न झाला, त्याविषयी अमेरिकेतील तपासयंत्रणा सावध झाली. त्यांनी तपास सुरू केला आणि तपासाची पाळेमुळे भारतापर्यंत पोहोचली तेव्हा या यंत्रणेने अमेरिकेच्या सरकारला लक्ष घालण्यास सांगितले. ज्यो बायडेन प्रशासनाने त्यानुसार कार्यवाही सुरू केली. दरम्यानच्या काळात अमेरिकेच्या न्याय विभागाने रीतसर खटला चालवण्यासाठी कागदपत्रेही तेथील एका न्यायालयात दाखल केली. हे करताना निव्वळ भारत सरकारशी पडद्यामागे संवाद राहील याची दक्षता घेतली. अध्यक्ष बायडेन किंवा त्यांच्या प्रशासनातील कोणाही जबाबदार व्यक्तीने जाहीररीत्या या तपासाचा उल्लेख केला नाही. त्याऐवजी प्रथम इंग्लंडमधील 'फायनॅन्शियल टाइम्स' आणि नंतर अमेरिकेतील 'वॉशिंग्टन पोस्ट' या पत्रांनी वाच्यता केली. अमेरिकेने वाच्यतेच्या भानगडीत न पडता प्रक्रियेला सुरुवात केली. कॅनडाने याच्या बरोबर उलट केले आणि टीका ओढवून घेतली. हा दोन व्यवस्थांमधील फरक. कदाचित अमेरिकेने सध्याची त्यांची भारतमैत्री पाहता, आडूनच भारताला याविषयी अवगत करण्याचे राजकीय धोरण अवलंबले असेल. याउलट राजकीय गरजेपोटीच ट्रुडोंनी आदळआपट सुरू केली हे स्पष्ट आहे. आता मुद्दा आपण काय करणार हा आहे.कारण 'पुरावे द्यावेत' असे आपण अमेरिकेला सुनावू शकत नाही. प्रथम निखिल गुप्ता आणि आता विकास यादव अशी नावेच अमेरिकेच्या तपासात उघड झाली आहेत. यातील विकास यादवचे नाव नुकतेच जाहीर झाले. तर गेल्या वर्षी निखिल गुप्ता याचे नाव जाहीर झाल्यानंतर त्याला चेक प्रजासत्ताकात अटक झाली. काही महिन्यांपूर्वी त्याचे अमेरिकेत प्रत्यार्पण झाले. यांतील विकास यादव हे नाव भारताच्या दृष्टीने अधिक अडचणीचे. कारण तो माजी भारतीय गुप्तचर असल्याचे अमेरिकेत दाखल झालेल्या आरोपपत्रात नमूद आहे. विकास हा 'रॉ' या भारतीय गुप्तचर संस्थेचा कर्मचारी होता, की हस्तक याविषयी स्पष्टता नाही. पण तो केंद्रीय राखीव पोलीस दलात सहायक समादेशक (असिस्टंट कमांडंट) होता आणि त्याची त्या गणवेशातील छायाचित्रेही समाजमाध्यमांवर प्रसृत झालेली आहेत. त्यामुळे 'आता तो भारत सरकारसाठी काम करत नाही' हा आपला बचाव काहीसा लंगडा ठरतो. हा तपास आणखी पुढे सरकू लागला आणि आपण त्यानंतर खुलासे करत राहिलो, तर धावपळ आणि नामुष्कीशिवाय फार काही हाती लागणार नाही. आपण कॅनडाला डोळे वटारू शकतो, अमेरिकेबाबत ते संभवत नाही. या संदर्भात पन्नू किती खुनशी आहे किंवा निज्जर कसा माथेफिरू होता या दाव्यांना फारसा अर्थ नाही. निज्जर आणि पन्नू प्रकरणे समांतर प्रकाशात आली आहेत. दोन्हींमागे समान दुवा भारत आहे. त्यामुळे भारत सरकारने भावनांचा आधार न घेता, अमेरिकेशी संवाद साधून खरोखरच काय घडले.

## प्रासंगिक »

### अडगेची राहू...

***भूमिका न घेणे किंवा पुढील लाभ नजरेसमोर ठेवून चुकीच्या निर्णयांची री ओढणे हा शिक्षण क्षेत्राला जडलेला गंभीर आजार...***

गेले तीन दिवस 'लोकसत्ता'ने अभ्यासक्रम बदलाच्या प्रस्तावाबाबत विस्तृत वृत्तांत प्रसृत केले. निवडणुकीच्या साठमारीत मग्न असलेल्या राज्यातील राजकीय पक्षांस त्यावर भाष्य करण्यास वेळ नाही. तथापि हा विषय राजकारण्यांवर सोडून 'हलक्यात घ्यावा' (हे नवे 'हिंदा'ळलेले मराठी) असा नसल्याने त्यावर भाष्य आवश्यक ठरते.याचे कारण नवा, आदर्श, संस्कारक्षम अभ्यासक्रम राज्यभर लागू करण्याचे श्रेय घेण्याच्या नादात आचारसंहितेच्या आदल्या दिवशी नव्या अभ्यासक्रम आराखड्याचा अंतिम मसुदा जाहीर करण्यात आला. सरकारच्या लेखी महामंडळांवर कोणाची तरी वर्णी लावणे आणि पुढची पिढी घडवेल/बिघडवेल असा अभ्यासक्रम या दोन्हींचे मोल एकच! हा नवा मसुदा पाहिल्यास सक्षम मनुष्यबळाच्या रूपाने या देशाची 'नालंदा'पासूनची शैक्षणिक परंपरा पुढे जाण्याऐवजी शिक्षण विभागाने मुखभंगाची परंपरा राखल्याचा विश्वास नक्की मिळतो..

लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपचे हात आकाशाला पोहोचले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नेतृत्व एकहाती चारशे जागा जिंकून देईल असा (अति) आत्मविश्वास भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याला होता. भाजपच्या नेतृत्वालाही तसेच वाटत असावे. त्यांनी मोठ-मोठ्या घोषणा केल्या, गॅरंटी दिली.

# संघ हा निवडणुकीतील 'एक्स फॅक्टर'?

लोक आपल्यालाच मते देणार ही बाब त्यांनी गृहीत धरली. लोकांना हे गृहीत धरणे आवडले नसावे, त्यांनी भाजपच्या नेतृत्वाच्या पारड्यात एकगठ्ठा मते न देऊन दणका दिला. लोकसभा निवडणुकीत गर्वाचे घर खाली झाल्यानंतर भाजपला एकदम आपल्या मूळ संघटनेची म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आठवण झाली असावी. लोकसभेच्या निवडणुकीत आम्हाला संघाची गरज नाही, असे म्हणणारा भाजप हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये पूर्णपणे संघाच्या मदतीवर अवलंबून होता असे निकालावरून स्पष्ट होते.लोकसभा निवडणुकीत भाजपने आमची मदत मागितलीच नाही तर आम्ही ती कशी पुरवणार, असे संघाचे म्हणणे होते. त्यामुळे त्या वेळी उत्तर प्रदेश, महाराष्ट्र अशा भाजपसाठी अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या राज्यांमध्ये संघाचे कार्यकर्ते भाजपच्या प्रचारासाठी उतरले नाहीत. संघानेही अप्रत्यक्षपणे भाजपच्या नेतृत्वाला संघाची 'ताकद' दाखवून



दिली. हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपच्या नेतृत्वाला आपली ही चूक कळली असावी आणि कदाचित संघाबरोबर तडजोडीची भूमिका घेतली असावी. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत निष्क्रिय असलेला संघ हरियाणाच्या विधानसभा निवडणुकीत कमालीचा सक्रिय झालेला होता. संघातील सहकार्यवाह हरियाणाची जबाबदारी सांभाळत होते. जातेतरांच्या ध्रुवीकरणाचे कळीचे काम संघाच्या कार्यकर्त्यांनी केल्याचे बोलले जाते. हरियाणामध्ये विजय मिळेल असे खुद्द भाजपच्या नेत्यांनाही वाटत नव्हते. संघातील कार्यकर्ते मात्र खासगीमध्ये भाजप विजयी होऊ शकतो असा विश्वास व्यक्त करत होते. हरियाणात संघाने भाजपला विजय मिळवून देण्यासाठी कष्ट घेतले असतील तर तो आपल्या मूळ राज्यात म्हणजे महाराष्ट्रात ते का घेणार नाही? त्यामुळे महाराष्ट्रात संघ हा महायुतीसाठी 'एक्स फॅक्टर' ठरण्याची शक्यता आहे.भाजप आणि संघ निष्ठावानांच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या वेळची परिस्थिती आता राहिलेली नाही. राज्यात संघ पूर्णपणे सक्रिय झालेला आहे. भाजपच्या निवडणुकीच्या निर्णयप्रक्रियेमध्ये संघाच्या सहकार्यवाहांच्या मतांना अधिक महत्त्व दिले जाऊ लागले आहे. संघाच्या नेहमीच्या पद्धतीनुसार मतदारसंघनिहाय संघाच्या प्रतिनिधींकडे जबाबदारी देण्यात आली आहे. सहकार्यवाह राज्याचा दौरा करत आहेत. राज्याच्या विधानसभा निवडणुकीत संघ प्रत्यक्ष कामाला लागला हा एक भाग झाला! भाजपच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेमध्ये संघ आता देवेंद्र फडणवीस यांच्या पूर्णपणे पाठीशी उभे राहिला असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

नेमकं कारण काय

## यंदा मार्चअखेरीस बाजारत येण्याचा अंदाज

# हापूस हंगाम महिनाभर लांबला?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोकण किनारपट्टीवर गत आठवडाभर सतत पाऊस सुरू आहे. सततच्या पावसामुळे आणि थंडीच्या अभावामुळे मोहोर येण्याची प्रक्रिया थांबली आहे. आता पाऊस थांबला तर डिसेंबरमध्ये मोहोर येईल. त्यामुळे दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात बाजारात येणारा हापूस यंदा मार्चअखेरीस बाजारत येण्याचा अंदाज आहे. हापूसचा हंगाम किमान महिनाभर लांबणीवर गेला आहे.**

## मोहोर येण्याची प्रक्रिया थांबली





कोकण किनारपट्टीवर मागील आठवड्यात मुसळधार पाऊस झाला. भात पिकाचे नुकसान झाले. कापणीला आलेल्या शेतातील उभ्या भात पिकाला कोंब आले आहेत. त्यात भर म्हणून जगभरात प्रसिद्ध असलेल्या कोकणातील हापूस आंब्याला मोठा फटका बसला आहे. दरवर्षी पहिल्या टप्प्यात ऑक्टोबरच्या मध्यापासून मोहोर येतो आणि नोव्हेंबरमध्ये मोठ्या प्रमाणावर मोहोर येतो. पण, पावसामुळे पहिल्या टप्प्यातील मोहोर कुजला आहे. सततच्या पावसामुळे आंब्याच्या झाडावर बुरशी वाढली आहे.कोकण किनारपट्टीवर मागील आठवड्यात मुसळधार पाऊस झाला. भात पिकाचे नुकसान झाले. कापणीला आलेल्या शेतातील उभ्या भात पिकाला कोंब आले आहेत. त्यात भर म्हणून जगभरात प्रसिद्ध असलेल्या कोकणातील हापूस आंब्याला मोठा फटका बसला आहे. दरवर्षी पहिल्या टप्प्यात ऑक्टोबरच्या मध्यापासून मोहोर येतो आणि नोव्हेंबरमध्ये मोठ्या प्रमाणावर मोहोर येतो. पण, पावसामुळे पहिल्या टप्प्यातील मोहोर कुजला आहे. सततच्या पावसामुळे आंब्याच्या झाडावर बुरशी वाढली आहे.चांगला मोहोर येण्यासाठी झाडांना पाण्याचा ताण मिळणे. थंडीत वाढ होणे, मतलई वारे सुरू होण्यासह तापमान १७ – २५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान असावे लागते. यंदा सततच्या पावसामुळे हे नैसर्गिक वातावरण तयार झाले नाही. आता पाऊस थांबला तरीही चांगला मोहोर येण्यास डिसेंबर महिना उजाडेल. फेब्रुवारी महिन्यात बाजारात येणारा हापूस यंदा मार्चअखेरीस बाजारात येईल. हापूस हंगाम किमान महिनाभर लांबणीवर जाणार आहे, अशी माहिती कोकण हापूस आंबा उत्पादक व विक्रेता सहकारी संघाचे अध्यक्ष विवेक भिडे यांनी दिली.कोकण किनारपट्टीवर गत आठवडाभर सतत पाऊस सुरू आहे. सततच्या पावसामुळे आणि थंडीच्या अभावामुळे मोहोर येण्याची प्रक्रिया थांबली आहे. आता पाऊस थांबला तर डिसेंबरमध्ये मोहोर येईल. त्यामुळे दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात बाजारात येणारा हापूस यंदा मार्चअखेरीस बाजारत येण्याचा अंदाज आहे. हापूसचा हंगाम किमान महिनाभर लांबणीवर गेला आहे.

## थंडी पडलीच नाही तर काय?

थंडीत वाढ होणे, मतलई वारे सुरू होण्यासह तापमान १७ – २५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान असावे लागते. यंदा सततच्या पावसामुळे हे नैसर्गिक वातावरण तयार झाले नाही. आता पाऊस थांबला तरीही चांगला मोहोर येण्यास डिसेंबर महिना उजाडेल. फेब्रुवारी महिन्यात बाजारात येणारा हापूस यंदा मार्चअखेरीस बाजारात येईल. हापूस हंगाम किमान महिनाभर लांबणीवर जाणार आहे, अशी माहिती कोकण हापूस आंबा उत्पादक व विक्रेता सहकारी संघाचे अध्यक्ष विवेक भिडे यांनी दिली.

कोकण किनारपट्टीवर मागील आठवड्यात मुसळधार पाऊस झाला. भात पिकाचे नुकसान झाले. कापणीला आलेल्या शेतातील उभ्या भात पिकाला कोंब आले आहेत. त्यात भर म्हणून जगभरात प्रसिद्ध असलेल्या कोकणातील हापूस आंब्याला मोठा फटका बसला आहे. दरवर्षी पहिल्या टप्प्यात ऑक्टोबरच्या मध्यापासून मोहोर येतो आणि नोव्हेंबरमध्ये मोठ्या प्रमाणावर मोहोर येतो. पण, पावसामुळे पहिल्या टप्प्यातील मोहोर कुजला आहे. सततच्या पावसामुळे आंब्याच्या झाडावर बुरशी वाढली आहे.कोकण किनारपट्टीवर मागील आठवड्यात मुसळधार पाऊस झाला. भात पिकाचे नुकसान झाले. कापणीला आलेल्या शेतातील उभ्या भात पिकाला कोंब आले आहेत. त्यात भर म्हणून जगभरात प्रसिद्ध असलेल्या कोकणातील हापूस आंब्याला मोठा फटका बसला आहे. दरवर्षी पहिल्या टप्प्यात ऑक्टोबरच्या मध्यापासून मोहोर येतो आणि नोव्हेंबरमध्ये मोठ्या प्रमाणावर मोहोर येतो. पण, पावसामुळे पहिल्या टप्प्यातील मोहोर कुजला आहे. सततच्या पावसामुळे आंब्याच्या झाडावर बुरशी वाढली आहे.

# मुलाने हिरवा सूर्य कुंचल्यातून रेखाटला

## चित्रकार प्रेमजीत बारिया यांच्या सर्जनशीलतेवरील प्रकाश

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**चित्रकलेची एक स्पर्धा आम्ही घेतली होती. त्यात एका मुलाने चित्रामध्ये हिरव्या रंगाचा सूर्य दाखवला होता. त्यामुळे आपणही प्रभावित झालो. त्या मुलाशी संवाद साधला तेव्हा त्याने हिरवा सूर्य असला तर... आणि त्यातूनही काही अर्थ ध्वनित झाले असते, अशी संकल्पना मांडली.**

त्यातून मुलांची सर्जनशीलता लक्षात आली, असे सांगत पद्मश्री पुरस्काराने सन्मानित गुजरातच्या दीव-दमण येथील ज्येष्ठ चित्रकार प्रेमजीत बारिया यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेलाही (एआय) आव्हान देणारी ताकत सर्जनशीलतेमध्ये दडल्याचा विश्वास दिला.येथील एकनाथ नाट्य मंदिरमध्ये बुधवारपासून चतुर्थ पद्म फेस्टिव्हलला सुरुवात झाली. गुरुवारी दुपारच्या संवादसत्रात मेधा पाध्ये-आठल्ये व उदय भोईर यांनी कला, हेरिटेज स्केच कलाकार असलेले प्रेमजीत बारिया यांना बोलते केले. यावेळी त्यांनी मुलांना काय संदेश द्याल, या प्रश्नावर त्यांचे काही अनुभव मांडले. त्यात वरील स्पर्धेच्या विषयानुषंगाने बारिया यांनी एआयमुळे नवे आव्हान उभे राहिल्याच्या अनामिक भीतीवर भाष्य केले.सर्जनशीलता हीच तुमच्यातील शक्ती असून,



त्यावरच आपण आपल्याला घडवू शकतो, असे त्यांनी सांगितले. यावेळी पद्मश्री पुरस्कार स्वीकारल्यानंतरची पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबतची एक आठवणही त्यांनी सांगितली. आपण काढलेली चित्रे पंतप्रधानांनी त्यांच्या समाजमाध्यमावरून प्रसारित केली, याचा मनस्वी आनंद झाल्याचे सांगून त्यांनी जीवनात साधेपणा हवा आणि तो ठेवता आला पाहिजे, कारण लहान व्यक्तिसुद्धा तुमची ओळख ठेवतो, असा विचार मांडला.

## हिरव्या रंगाचा सूर्य दाखवला

सायंकाळी सावनी तळवलकर यांचे तबला वादन झाले. संवादिनीवर अभिजित शिनकर होते. तर कजॉनवर ईशान परांजपे, कलाबशवर ऋतुराज हिंगे यांनी सादरीकरण केले.चित्रकलेची एक स्पर्धा आम्ही घेतली होती. त्यात एका मुलाने चित्रामध्ये हिरव्या रंगाचा सूर्य दाखवला होता.

आपला परिचय साधेपणामुळेच आहे, असेही ते म्हणाले. फेस्टिव्हलमध्ये सकाळच्या सत्रात बुद्धिबळपटू भाग्यश्री साठे-ठिपसे, हरियाणातील रोहतक येथील आचार्य सुकामा यांच्याशी तर दुपारच्या सत्रात डॉ. ए. एस किरण कुमार, पं. सुरेश तळवलकर या पद्मश्री पुरस्काराने सन्मानित मान्यवरांशी संवाद साधण्यात आला. सायंकाळी सावनी तळवलकर यांचे तबला वादन झाभाग्यश्री साठे-ठिपसे, हरियाणातील रोहतक येथील आचार्य सुकामा यांच्याशी तर दुपारच्या सत्रात डॉ. ए. एस किरण कुमार, पं. सुरेश तळवलकर या पद्मश्री पुरस्काराने सन्मानित मान्यवरांशी संवाद साधण्यात आला.

## नेमकं प्रकरण काय? फोटो शेअर करत भाजपा नेत्यावर गंभीर आरोप

# दिल्लीनंतर बिहारमध्येही केलं मतदान?

### राकेश सिन्हा यांच्यावर गंभीर आरोप

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि इतर विरोधी पक्ष गेल्या काही दिवसांपासून निवडणूक प्रक्रिया आणि मतदार याद्यांसंबंधी अनेक प्रश्न उपस्थित करत आहेत. यादरम्यान गुरुवारी आम आदमी पक्ष आणि काँग्रेसने भाजपावर पुन्हा गंभीर आरोप केले आहेत. या पक्षांनी फेब्रुवारी महिन्यात दिल्ली निवडणुकीत मतदान केल्यानंतर भारतीय जनता पक्षाचे माजी खासदार राकेश सिन्हा यांनी आज पुन्हा एकदा बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात मतदान केल्याचा आरोप केला आहे.**



आम आदमी पक्षाचे नेते सौरभ भारद्वाज यांनी वोट चोरीचा आरोप केला आहे. भाजपाचे राज्यसभा खासदार आणि सर्वांना संस्कार शिकवणाऱ्या आरएसएसचे विचारक राकेश सिन्हा यांनी फेब्रुवारीमध्ये द्वारका येथून दिल्ली निवडणुकीत मतदान केले, आणि त्यानंतर आज त्यांनी सिवान येथून बिहार निवडणुकीत मतदान केले. त्यांनी हे उघडपणे फसवणुकीचे प्रकरण असल्याचे म्हटले आहे."ते मोतीलाल नेहरू विद्यालय, दिल्ली विद्यापीठात शिकवतात, त्यामुळे हे इच्छा असूनही बिहारचा पत्ता दाखवू शकत नाहीत. तुम्हाला जर वाटत असेल की भाजपाची चोरी पकडली गेली तर ते सुधारतील? तर अजिबात नाही. हे उघडपणे चोरी करतील," असे भारद्वाज म्हणाले आहेत. त्यांनी एक्सवर यासंबंधिचे फोटो देखील पोस्ट केले आहे."ते मोतीलाल नेहरू विद्यालय, दिल्ली विद्यापीठात शिकवतात, त्यामुळे हे इच्छा असूनही बिहारचा पत्ता दाखवू शकत नाहीत. तुम्हाला जर वाटत असेल की भाजपाची चोरी पकडली गेली तर ते सुधारतील? तर अजिबात नाही. हे उघडपणे चोरी करतील," असे भारद्वाज म्हणाले आहेत. त्यांनी एक्सवर यासंबंधिचे फोटो देखील पोस्ट केले आहे.या आरोपांना सिन्हा यांनी उत्तर दिले आहे. त्यांनी स्पष्ट केलं की, फेब्रुवारीमधील दिल्ली निवडणुकीदरम्यान त्यांचे नाव दिल्लीच्या मतदार यादीत असले तरी, बिहारच्या राजकारणात सक्रिय सहभाग असल्यामुळे त्यांनी त्यांचा पत्ता बिहारमधील बेगुसराया येथील मनसेर पूर असा बदलून घेतला आहे. तसेच त्यांनी या आरोपांवरून मानहाणीचा खटला दाखल करण्याचा इशाराही यावेळी दिला आहे.राजकारण इतके हलके होऊ शकते याचा मला अंदाज नव्हता. संविधानावर आस्था ठेवणाऱ्यांवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी शंभर वेळा विचार केला पाहिजे. माझे नाव दिल्लीच्या मतदार यादीत होते. बिहारच्या राजकारणातील सक्रियतेमुळे मी आपले नाव गाव मनसेर पूर (बेगुसराया) करून घेतले आहे. या आरोपासाठी मी मानहानी खटला दाखल करावा का?" असे सिन्हा म्हणाले आहेत.सिन्हा म्हणाले की त्यांचे वडिलोपार्जित घर बेगुसरायमध्ये आहे. "मी मातीतून उखडलेला माणूस नाही. मी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी घेऊन आणि पैसे खर्च करून माझ्या गावी आलो. संविधानाच्या मूल्यांबद्दल कोण बोलत आहे? आम आदमी पार्टी लोकशाहीवरील कलंक आहे. डागाळलेल्या लोकांनी आरएसएसला नैतिकता शिकवू नये," असे सिन्हा म्हणाले आहेत. तसेच त्यांनी आपल्या अपजेट केलेल्या मतदार यादीचा फोटोही शेअर केला, ज्यात त्यांचा पत्ता बेगुसरायमधील मनसेरपूर असा दिलेला आहे.आम आदमी पक्षाचे नेते सौरभ भारद्वाज यांनी वोट चोरीचा आरोप केला आहे. भाजपाचे राज्यसभा खासदार आणि सर्वांना संस्कार शिकवणाऱ्या आरएसएसचे विचारक राकेश सिन्हा यांनी फेब्रुवारीमध्ये द्वारका येथून दिल्ली निवडणुकीत मतदान केले, आणि त्यानंतर आज त्यांनी सिवान येथून बिहार निवडणुकीत मतदान केले. त्यांनी हे उघडपणे फसवणुकीचे प्रकरण असल्याचे म्हटले आहे."ते मोतीलाल नेहरू विद्यालय, दिल्ली विद्यापीठात शिकवतात, त्यामुळे हे इच्छा असूनही बिहारचा पत्ता दाखवू शकत नाहीत. तुम्हाला जर वाटत असेल की भाजपाची चोरी पकडली गेली तर ते सुधारतील? तर अजिबात नाही. हे उघडपणे चोरी करतील," असे भारद्वाज म्हणाले आहेत. त्यांनी एक्सवर यासंबंधिचे फोटो देखील पोस्ट केले आहे."ते मोतीलाल नेहरू विद्यालय, दिल्ली विद्यापीठात शिकवतात, त्यामुळे हे इच्छा असूनही बिहारचा पत्ता दाखवू शकत नाहीत. तुम्हाला जर वाटत असेल की भाजपाची चोरी पकडली गेली तर ते सुधारतील? तर अजिबात नाही.

### बिहारच्या राजकारणात सक्रिय

हे उघडपणे चोरी करतील," असे भारद्वाज म्हणाले आहेत. त्यांनी एक्सवर यासंबंधिचे फोटो देखील पोस्ट केले आहे.या आरोपांना सिन्हा यांनी उत्तर दिले आहे. त्यांनी स्पष्ट केलं की, फेब्रुवारीमधील दिल्ली निवडणुकीदरम्यान त्यांचे नाव दिल्लीच्या मतदार यादीत असले तरी, बिहारच्या राजकारणात सक्रिय सहभाग असल्यामुळे त्यांनी त्यांचा पत्ता बिहारमधील बेगुसराया येथील मनसेर पूर असा बदलून घेतला आहे.

# "तुम्ही 'धोका' कसे म्हणू शकता?


## पतंजलीच्या जाहिरातींवर दिल्ली उच्च न्यायालयाचे परखड मत

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**योगगुरू रामदेव यांच्या पतंजली आयुर्वेद कंपनीच्या जाहिरातींच्या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. न्यायालयाने पतंजली कंपनीला ते त्यांच्या स्वतःच्या च्यवनप्राशला चांगले सांगत असताना, इतर सर्व च्यवनप्राश ब्रँड्सना 'धोका' (फसवे किंवा फसवणूक करणारे) असे कसे म्हणू शकतात? असा प्रश्न विचारला आहे.**

डाबर इंडियाने पतंजलीच्या अशा जाहिराती चालवण्यावर अंतरिम बंदी (INTERIM INJUNCTION) घालण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना, न्यायमूर्ती तेजस करिया म्हणाले की, पतंजली स्वत: सर्वोत्तम असल्याचा दावा करू शकते, परंतु ते इतरांना फसवे म्हणू शकत नाहीत."तुम्ही म्हणत आहात की सर्वजण हा 'धोका' आहेत, आणि फक्त मी खराखुरा आहे. तुम्ही इतर सर्व च्यवनप्राशला 'धोका' कसे म्हणू शकता? तुम्ही ते दुय्यम म्हणू शकता, पण तुम्ही त्यांना फ्रॉड म्हणू शकत नाही....शब्दकोशात दुसरा शब्द उपलब्ध नाही का जो 'धोका' या ऐवजी वापरला जाऊ शकेल?" असा प्रश्न न्यायमूर्तींनी





विचारला."धोका हा नकारात्मक, अपमानजनक शब्द आहे. तुम्ही म्हणत आहात ते (कंपन्या) या फ्रॉड आहेत आणि लोक काहीतरी बनावट खात आहेत," असेही ते म्हणाले.डाबरने असाही आरोप केला आहे की पतंजली ही कंपनी खोटे दावे करत आहे की त्यांच्या च्यवनप्राशमध्ये ५१ आयुर्वेदिक औषधी आणि केशर आहे. कारण २०१४ च्या सरकारच्या ॲडव्हायजरीमध्ये या दाव्याला दिशाभूल करणारे ठरवण्यात आले होते. तसेच त्यांनी युक्तीवाद केला की, क्लासिकल आयुर्वेदिक औषधाला 'विशेष' (SPECIAL) असे प्रीफिक्स लावणे, हे ड्रग्ज रुल्समधील नियम १५७(१-बी) चे उल्लंघन आहे. या नियमानुसार आयुर्वेदिक फॉर्म्युलेशनच्या फसव्या लेबलिंगवर बंधने घालण्यात आलेली आहेत. डाबरच्या वतीने युक्तिवाद करणारे ज्येष्ठ वकील संदीप सेठी म्हणाले की, च्यवनप्राश हे क्लास ऑफ गुज आहे आणि इतर सर्व च्यवनप्राशना 'धोका' असे म्हणून, पतंजली त्या सर्वांची बदनामी करत आहे. "कोणालाही 'धोका' असे संबोधने हे बदनामी करणारे आहे. ते म्हणू शकतात की आम्ही तुम्हाला ओळखत नाही, पण ते सर्वांना एकाच ब्रशने रंगवू शकत नाहीत....

### लोक संवेदनशील आहेत

अधिक गंभीर आहे कारण लोक एका योग गुरूंना काही प्रमाणात सत्यतेशी जोडतात," असे सेठी म्हणाले.सेठी म्हणाले, "भीतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी हे सर्व केले जात आहे. माझ्याकडे एत १०० वर्षांहून जुनी कंपनी आहे. माझा बाजारात ६१ टक्के वाटा आहे. फक्त पाच दिवसांमध्ये ही जाहिरात ९ कोटी लोकांनी पाहिली आहे. लोक अशा प्रकारे संवेदनशील आहेत.

# नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला

कुणाल खेमू दिग्दर्शित 'मडगांव एक्सप्रेस' हा चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करताना दिसत आहे. या चित्रपटाचं कौतुक देखील होत आहे. या चित्रपटात दिव्येंदू शर्मा, प्रतिक गांधी, अविनाश तिवारी, उपेंद्र लिमये, छाया कदम हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत पाहायला मिळत आहेत. याशिवाय या चित्रपटात ग्लॅमरस डान्सर, अभिनेत्री नोरा फतेही झळकली आहे. या चित्रपटामुळे सध्या नोरा चर्चेत आली आहे. 'मडगांव एक्सप्रेस' या चित्रपटाच्या निमित्ताने दिव्येंदू, अविनाश आणि नोरा नुकतेच 'मॅशबल इंडियन' या युट्यूब चॅनलच्या 'द बॉम्ब जर्नी' या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी नोरा फतेहीने मुंबईतील सुरुवातीचा संघर्ष काळ सांगितला. ती म्हणाली, "जेव्हा मी भारतात पहिल्यांदा आली तेव्हा माझ्या जवळ ५ हजार रुपये होते. यावेळेस मला १०० डॉलर म्हणजे किती असतात हे अजिबात माहित नव्हतं. मी एका अपार्टमेंटमध्ये राहत होते. थ्री-बीएचके घर होतं. प्रत्येक रुममध्ये तीन मुली राहत होत्या, अशा एकूण नऊ वेड्या मुलींबरोबर मी राहत होते. हे माझ्यासाठी ट्रॉमा पेक्षा काही कमी नव्हतं. कधी कधी मला असं वाटायचं की, माझा भारतात येण्याचा निर्णय योग्य होता की चुकीचा होता."पुढे नोरा म्हणाली, "संघर्षाच्या काळात


माझ्याकडे खूप कमी पैसे होते. त्यामुळे मी फक्त अंडी आणि ब्रेड खाऊन दिवस काढले. माझ्या घराचं भाडं मी ज्या एजन्सीत काम करत होती तेच देत होते. पण माझ्या पगारातून घराचं भाडं कापलं जात होतं. त्यामुळे माझ्या हातात येणारा पगार खूप कमी होता. त्या पगारात मुंबई सारख्या शहरात राहणं खूप कठीण आहे."याआधी नोरा तिच्या संघर्षाविषयी अनेकदा बोलली होती. २०१९मध्ये एका मुलाखतीमध्ये ती म्हणाली होती, "संघर्षाच्या काळात ज्या एजन्सीत काम केलं ते आठवड्याचे फक्त तीन हजार रुपये देत होती. त्यामुळे संपूर्ण घर खर्च करून आठवड्याच्या शेवटी हातात पैसे नसायचे."दरम्यान, नोरा ही ३२ वर्षांची आहे. या वयात ती बॉलीवूडच्या आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक आहे. नोराने टेलिव्हिजनवरील अनेक डान्स रिॲलिटी शोचे परीक्षण केलं होतं. याशिवाय ती 'स्त्री', 'बाटला हाउस', 'बाहुबली द बिगनिंग', 'क्रॅक' यांसारख्या चित्रपटात झळकली आहे.

## अदाने नेसली चक्क 15 रुपयांची साडी

'द केरला स्टोरी' चित्रपटातील जबरदस्त अभिनयामुळे अभिनेत्री अदा शर्मा चर्चेत आली. या चित्रपटासाठी अदाला अनेक पुरस्कारदेखील जाहीर झाले आहेत. अदा अभिनयासह आपल्या वैयक्तिक आयुष्यातील गोष्टीही चाहत्यांबरोबर शेअर करत असते. अनेकदा अदाने तिच्या नानीचा म्हणजेच आजीचा उल्लेख केला आहे. 'गुलाबी साडी' या मराठमोळ्या गाण्यावर नात अदा आणि तिच्या आजीचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला होता. अशातच अदाचा आजीशी कनेक्ट असणारा अजून एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आज अदाने खास तिच्या आजीची साडी नेसली होती. आजीची साडी नेसायची अदाची ही काही पहिलीच वेळ नाही. पण, विशेष गोष्ट म्हणजे या साडीची किंमत फक्त १५ रुपये आहे असं ती म्हणाली.

## सोनम ड्रेसमुळे झाली ट्रोल

सोनम कपूर ही फॅशन आयकॉन, फॅशन दिवा या नावांनी इंडस्ट्रीमध्ये प्रचलित आहे. अभिनयाबरोबरच ती आपल्या वेगवेगळ्या लूक्समुळे सतत चर्चेत असते. सोनमनं नुकतीच तिच्या बुक लॉंचला हजेरी लावली होती. या लॉंच सोहळ्याला सोनमने काळ्या रंगाचा ड्रेस घातला होता. तिच्या या लूकचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.सोनमच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी कमेंट्स करीत तिला ट्रोल केलं आहे. एकानं कमेंट करीत लिहिलं, "दारा सिंगसारखी दिसतेय." तर, "ही नाईट ड्रेसवर का फिरतेय." असं दुसऱ्या नेटकऱ्यानं कमेंट करीत लिहिलं. "हिचा ड्रेसिंग सेन्स कुठे गेला", असंही एकानं विचारलं. "सोनमनं उशांची कव्हर्स घातली आहेत, असं वाटतंय. जर कोणती गोष्ट सध्या ट्रेंडमध्ये किंवा फॅशनमध्ये असली तरी ती प्रत्येकाला शोभून दिसेल असं नसतंबॉलीवूडमधली फ्लॉप अभिनेत्री" असं एका युजरने लिहिलं. "यापेक्षा वाईट ड्रेस मी आजपर्यंत बघितला नाही.", "चालता फिरता हॅंगर", "ती हॅंगरमधून ड्रेस काढायला विसरली" अशा प्रकारच्या ट्रोल्स करणाऱ्या कमेंट्स सोनम कपूरच्या व्हिडीओवर करण्यात आल्यात.



## इंडस्ट्रीतला आऊटसायडर ते आम आदमीचा हिरो!

घरी चित्रपटाशी संबंधित कुणीही नाही, मूळ गाव मुंबानगरीपासून हजारो किलोमीटर दूर हिमाचल प्रदेशात, अल्फा मेल अर्थात पौरुष अवतारी प्रतिमा नाही, सिक्स पॅक ॲब्स नाहीत. चित्तथरारक स्टंट केल्यानंतर ललनांच्या गराड्यात वगैरेही नाही. हिंदी मालिका आणि टीव्ही सृष्टीच्या हिरोच्या पारंपरिक प्रतिमेला छेद देत पडद्यावर आम आदमी साकारुन त्यालाच नायकत्व देणाऱ्या विक्रांतचा आज वाढदिवस. टीव्ही मालिकांमध्ये काम करू लागल्यानंतर मंडळी तिथेच स्थिरावतात. पण विक्रांतने टीव्ही ते चित्रपट असं स्थित्यंतर केलं. सुरुवातीला पदरी पडलेल्या छोट्या भूमिका चोख निभावत विक्रांतने वाटचाल सुरू ठेवली. 12TH FAIL निमित्ताने विक्रांतला हिरो करणारी कहाणी पडद्यावर आली. चंबळसारख्या दुर्गम भागातून सुरुवात करून थेट प्रशासकीय अधिकारी झालेल्या मनोज शर्मा यांची कारकीर्द विक्रांतने सुरेख साकारली. याचा प्रत्यय चाहत्यांच्या प्रतिक्रिया, पुरस्कार आणि सोशल मीडियावर वाढते फॉलोअर्स यातून सिद्ध होताना दिसत आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने विक्रांतच्या सफरीचा घेतलेला धांडोळा. विक्रांतचं कुटुंब मूळचं हिमाचल प्रदेशमधील शिमल्याचं. त्याच्या वडिलांचं नाव जॉली आणि आईचं नाव आमना आहे. त्याला मोईन नावाचा मोठा भाऊ आहे. त्याच्या वडिलांचं कुटुंब ख्रिश्चन धर्म पाळतं, तर त्याच्या आईचं कुटुंब शीख आहे. विक्रांतच्या आई-बाबांनी पळून जाऊन लग्न केलं होतं, नंतर ते काही काळ विदर्भातील नागभीड इथं राहत होते.



## तापसी पन्नूच्या सिक्रेट लग्नातील पहिला व्हिडीओ

बॉलीवूड अभिनेत्री तापसी पन्नू गेल्या काही दिवसांपासून तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. जवळच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत तिने बॉयफ्रेंड मॅथियस बोशी लग्न केल्याचं वृत्त काही दिवसांपूर्वी समोर आलं होतं. परंतु, यावर तापसीने कुठेही अधिकृतपणे भाष्य केलं नव्हतं. यामुळे नेमकं तिचं लग्न झालंय की नाही? याबाबत साशंकता निर्माण झाली होती. अशातच तिच्या लग्नातील एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने तापसी लग्नबंधनात अडकल्याचं अखेर स्पष्ट झालं आहे.जवळच्या मित्रमंडळींच्या उपस्थितीमध्ये तापसी राजस्थानमधील उदयपूरमध्ये विवाहबंधनात अडकली आहे. वरमाला विधीसाठी अभिनेत्रीने लग्नमंडपात थाटामाटात एन्ट्री घेतली होती. लाल रंगाचा भरजरी पंजाबी ड्रेस, डोळ्यावर गॉगल, हातात लग्नाचा चुडा अशा खास अंदाजात तापसी मंडपात आली होती.तापसी पन्नूने लग्नसमारंभात पंजाबी गाण्यावर एन्ट्री घेतल्याचं पाहायला मिळालं. नववधूच्या रुपात ती अतिशय सुंदर दिसत होती. तसेच मॅथियस बोने देखील यावेळी पारंपरिक लूक केला होता. एकमेकांना वरमाला घातल्यावर या जोडप्यावर सगळ्यांनी फुलांची उधळण केली. तापसीच्या लग्नातील हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर सर्वत्र व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ पाहून नेटकऱ्यांनी अभिनेत्रीवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, अजूनही तापसीने लग्नाबाबत कोणतंही स्पष्टीकरण दिलेलं नाही. दरम्यान, तापसी माजी बॅडमिंटनपटू मॅथियस बोबरोबर जवळपास दहा वर्षांपासून रिलेशनशिप होती. आता या जोडप्याने लग्न केलं आहे. अनुराग कश्यप आणि कनिका ढिल्लों हे दोघे तिच्या लग्नाला उपस्थित होते.

ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी मात

भारताची ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी मात

# अष्टपैलूंची निर्णायक कामगिरी!

## विजयाचे श्रेय सर्व फलंदाजांना

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या अधिकाधिक अष्टपैलू खेळविण्याच्या योजनेला अखेर यश आलेच. आव्हानात्मक खेळपट्टीवर वॉशिंग्टन सुंदर (१२ धावा व ३ बळी), अक्षर पटेल (नाबाद २१ धावा व २ बळी) आणि शिवम दुबे (२२ धावा व २ बळी) या अष्टपैलूंच्या निर्णायक कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने चौथ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात गुरुवारी यजमान ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी मात केली.**

गोल्ड कोस्ट येथे झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिल्यानंतर भारताने २० षटकांत ८ बाद १६७ अशी धावसंख्या उभारली. याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ १८.२ षटकांत ११९ धावांतच गारद झाला. त्यामुळे भारताने हा सामना जिंकत मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. केवळ एकच सामना शिल्लक असल्याने आपल्याला मालिका गमवावी लागणार नाही हेसुद्धा भारताने सुनिश्चित केले. कटारा ओव्हलच्या खेळपट्टीने मधल्या षटकांत फलंदाजांची कसोटी पाहिली. भारताने सातव्या षटकात बिनबाद ५६ धावांची मजल मारली होती. मात्र, त्यानंतर भारताची धावगती मंदावली. हेच चित्र ऑस्ट्रेलियाच्या डावातही पाहायला मिळाले. ऑस्ट्रेलियाचा संघ आठव्या षटकाअंती १ बाद ६२ अशा सुस्थितीत होता. मात्र, पुढच्या षटकात डावखुरा फिरकीपटू अक्षरने जोश इंग्लिसला (१२), तर त्याच्या पुढच्या षटकात मध्यमगती गोलंदाज शिवम दुबेने कर्णधार मिचेल मार्शला (३०) माघारी धाडले. त्यानंतर ऑस्ट्रेलियाची पडझड सुरू झाली. एकवेळ ३ बाद ९१ अशी धावसंख्या असणाऱ्या ऑस्ट्रेलियाने पुढील सात गडी २८ धावांतच गमावले. गेल्या सामन्यात तडाखेबंद फलंदाजी करणाऱ्या टीम डेव्हिडचा (१४) अडसर दुबेनेच दूर केला. भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने ऑस्ट्रेलियाच्या डावातील १७व्या षटकात ऑफ-स्पिनर वॉशिंग्टन सुंदरकडे पहिल्यांदा चेंडू




सोपवला. त्याने या षटकात सलग दोन चेंडूंवर मार्कस स्टोइनिस (१७) आणि झेवियर बार्टलेट (०), तर आपल्या पुढील षटकात ॲडम झॅम्पाला (०) माघारी धाडत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.त्याआधी, भारतासाठी शुभमन गिल (३९ चेंडूंत ४६) आणि अभिषेक शर्मा (२१ चेंडूंत २८) यांनी डावाची आक्रमक सुरुवात केली. मात्र, 'पॉवरप्ले'नंतरच्या षटकात लेग-स्पिनर झॅम्पाच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात अभिषेक बाद झाला. त्यानंतर फिरकीपटूंविरुद्ध मोठे फटके मारण्यासाठी दुबेला (१८ चेंडूंत २२) तिसऱ्या क्रमांकावर बढती देण्यात आली. परंतु ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मार्शने चतुराई दाखवताना दुबेविरुद्ध फिरकीपटूंना गोलंदाजी देणे टाळले. ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी 'स्लोवर' चेंडूचा खुबीने वापर करत दुबे आणि गिलला फटकेबाजी करण्यापासून रोखले. 'पॉवरप्ले' संपताना १८ चेंडूंत २६ धावांवर खेळणारा गिल पुढील २१ चेंडूंत २० धावाच करू शकला. त्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव (१० चेंडूंत २०), वॉशिंग्टन (७ चेंडूंत १२) आणि अक्षर (११ चेंडूंत नाबाद २१) यांनी काही मोठे फटके मारल्याने भारताला १६५ धावांचा टप्पा ओलांडता आला.विजयाचे श्रेय सर्व फलंदाजांना जाते. या खेळपट्टीवर २००-२२० धावा करता येणार नाहीत हे शुभमन आणि अभिषेक यांना सुरुवातीला कळले होते. त्यानुसार त्यांनी खेळण्याच्या शैलीत बदल केला. अन्य फलंदाजांनीही योगदान दिले. गोलंदाजीत मी आणि प्रशिक्षक गंभीर यांनी खेळाडूंना स्पष्ट संदेश दिला होता. मैदानावर दव असल्याने गोलंदाजांनी या परिस्थितीशी जुळवून घेणे गरजेचे होते. त्यात ते यशस्वी ठरले. त्यामुळेच आम्ही विजयी झालो.गोल्ड कोस्ट येथे झालेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिल्यानंतर भारताने २० षटकांत ८ बाद १६७ अशी धावसंख्या उभारली. याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ १८.२ षटकांत ११९ धावांतच गारद झाला. त्यामुळे भारताने हा सामना जिंकत मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली. केवळ एकच सामना शिल्लक असल्याने आपल्याला मालिका गमवावी लागणार नाही हेसुद्धा भारताने सुनिश्चित केले. कटारा ओव्हलच्या खेळपट्टीने मधल्या षटकांत फलंदाजांची कसोटी पाहिली. भारताने सातव्या षटकात बिनबाद ५६ धावांची मजल मारली होती. मात्र, त्यानंतर भारताची धावगती मंदावली. हेच चित्र ऑस्ट्रेलियाच्या डावातही पाहायला मिळाले. ऑस्ट्रेलियाचा संघ आठव्या षटकाअंती १ बाद ६२ अशा सुस्थितीत होता. मात्र, पुढच्या षटकात डावखुरा फिरकीपटू अक्षरने जोश इंग्लिसला (१२), तर त्याच्या पुढच्या षटकात मध्यमगती गोलंदाज शिवम दुबेने कर्णधार मिचेल मार्शला (३०) माघारी धाडले.

### भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब

एकवेळ ३ बाद ९१ अशी धावसंख्या असणाऱ्या ऑस्ट्रेलियाने पुढील सात गडी २८ धावांतच गमावले. गेल्या सामन्यात तडाखेबंद फलंदाजी करणाऱ्या टीम डेव्हिडचा (१४) अडसर दुबेनेच दूर केला. ऑफ-स्पिनर वॉशिंग्टन सुंदरकडे पहिल्यांदा चेंडू सोपवला. त्याने या षटकात सलग दोन चेंडूंवर मार्कस स्टोइनिस (१७) आणि झेवियर बार्टलेट (०), तर आपल्या पुढील षटकात ॲडम झॅम्पाला (०) माघारी धाडत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

# रोहितने धवल कुलकर्णीसह केला प्रँक

## रोहित शर्माने त्याच्या इन्स्टाग्रामवर नवीन व्हीडिओ शेअर केला

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाचा माजी कर्णधार रोहित शर्माने टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. फक्त वनडे सामने खेळणारा रोहित शर्मा फावल्या वेळेत सरावही करतो आणि त्याच्या मित्रांबरोबर वेळ घालवताना दिसतो. रोहित शर्माने निवृत्ती घेतल्यानंतर तो सोशल मीडियावर सक्रिय असल्याचं दिसलं.**



यादरम्यान रोहित शर्माने एक रील शेअर केली आहे. ज्यामध्ये तो धवल कुलकर्णी आणि दुसऱ्या एका मित्राबरोबर शॉक पेन प्रँक करताना दिसत आहे. रोहित शर्माने त्याच्या इंस्टाग्राम अकाउंटवर असाच एक मजेदार व्हिडिओ शेअर केला होता. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रोहित आपल्या नेहमीच्या बिनधास्त आणि मस्तीखोर शैलीत त्यांच्या मित्रांची फिरकी घेताना दिसत आहे. यादरम्यान मुंबई क्रिकेट संघातील रोहित शर्माचे दोन मित्र धवल कुलकर्णी, शार्दुल ठाकूर या व्हीडिओमध्ये दिसत आहेत.व्हिडिओच्या सुरुवातीला एक जण रोहितच्या जवळ व्यक्ती

### तेव्हा त्याला धक्का बसतो.

हे पाहून रोहित शर्मा हसून त्याला विचारतो, "काय झालं?" रोहित शर्माचा मित्र उत्तर देतो, "अरे, त्यात ते आहे: शॉक."तो मित्र नंतर तो पेन त्याच व्यक्तीला देतो ज्याने सुरुवातीला रोहितला दिला होता. त्या मित्राबरोबर, रोहित नंतर धवल कुलकर्णीकडे जातो. धवल तेव्हा जिममध्ये सराव करत असतो आणि मागे शार्दुल ठाकूर असतो. रोहित शर्मा त्याच्याकडे ऑटोग्राफ मागतो.

पेन घेऊन येतो आणि म्हणतो, "रो, तू मला ऑटोग्राफ देऊ शकतोस का?" रोहित त्याच्या मित्राकडून पेन घेतो आणि नंतर तो व्हीडिओ पाहून म्हणतो, "हा पेन नाहीये, मला माहितीये याच्यात काय आहे? थांब आता तुला सांगतो. आता याचा मी तुला वापर करून दाखवतो, माझ्या खास मित्राला देतो.रोहित मग त्याच्या एका मित्राला पेन देतो आणि त्याला त्याच्यासमोर डायरी ठेवतो आणि सही करायला सांगतो. दरम्यान, इतर मित्र त्याला सांगतात की तो किती प्रसिद्ध झाला आहेस तू. यानंतर रोहितचा मित्र बटण दाबून पेन उघडण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याला धक्का बसतो.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। शुक्रवार ।

। दि. 7 नोव्हेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## शिक्षण आणि औद्योगिक संस्थांच्या प्रयत्नातून

# विकसित भारत घडेल - हर्षवर्धन पाटील

### शिक्षण विश्व: पीसीईटी आणि टाटा मोटर्स, टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल यांच्या मध्ये सामंजस्य करार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**केंद्र सरकारने २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. त्यासाठी शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक समूहांनी एकत्र येऊन प्रयत्न करण्याची गरज आहे.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी), पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) आणि टाटा मोटर्स लि. (टीएमएल), टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल लि. (टीएमपीव्हीएल) यांच्या मधील सामंजस्य करारामुळे पीसीईटी शैक्षणिक समुहातील संस्थांमधील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रातील कौशल्य विकासास चालना मिळेल, असे प्रतिपादन पीसीसीईटीचे विश्वस्त तथा पीसीयूचे कुलगुरू हर्षवर्धन पाटील यांनी केले. पीसीईटी आणि टीएमएल तसेच टीएमपीव्हीएल यांच्या मध्ये सामंजस्य करार करण्यात आला. पीसीईटीच्या वतीने हर्षवर्धन पाटील, डॉ. गिरीश देसाई तर टीएमएल आणि टीएमपीव्हीएल यांच्या वतीने नीरज अगरवाल, अनुराग छारिया, आदिती गुप्ता, विवेक बिंद्रा यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी पीसीईटीच्या उपाध्यक्षा पद्माताई भोसले, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीईटी प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे, टाटा मोटर्सचे कमर्शियल व्हेईकल बिझनेस युनिट प्लांट हेड अनुराग छारिया, टीएमपीव्हीएल प्लांट हेड नीरज अग्रवाल, कॉर्पोरेट फंक्शन्सचे लर्निंग अँड डेव्हलपमेंट हेड मार्सेल फर्नांडिस, टीएमएलच्या एचआर प्रमुख अदिती गुप्ता, मानव संसाधन महाव्यवस्थापक विवेक बिंद्रा, अर्ली करिअर्स अँड कॅम्पस प्रोग्राम कॉर्पोरेट फंक्शन्स प्रमुख राजीव रंजन, कौशल्य विकास प्रमुख सुशील वारंग, कौशल्य विकास प्रमुख शशिकांत रोडे, कर्मचारी संबंध प्रमुख संतोष बडे आदी उपस्थित होते.

टीएमएल आणि टीएमपीव्हीएल यांना कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. या सामंजस्य करारामुळे टीएमएल आणि टीएमपीव्हीएलच्या पात्र प्रशिक्षणार्थी उमेदवार, प्रशिक्षणार्थींसाठी मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकीमधील डिप्लोमा प्रोग्रामची रचना, वितरण आणि व्यवस्थापन सहकार्य करण्यात येईल, ज्यामध्ये व्यावहारिक ज्ञान, औद्योगिक प्रशिक्षण आणि रोजगारक्षमता यावर लक्ष केंद्रित केले जाईल. हा सामंजस्य करार कौशल्य विकास आणि दर्जेदार शिक्षणाच्या क्षेत्रात पीसीईटी, टीएमएल आणि टीएमपीव्हीएल यांच्यातील दीर्घकालीन सहकार्य होईल असे अनुराग छारिया म्हणाले.

डॉ. गिरीश देसाई म्हणाले की, मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकीमधील हा डिप्लोमा कार्यक्रम बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी (कोणत्याही प्रवाहात) तीन वर्षांसाठी आणि आयटीआय विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षांसाठी आहे. हा क्रेडिट आधारित सेमिस्टर नुसार कार्यक्रम आहे.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाची सर्व वैशिष्ट्ये यामध्ये आहेत. मूल्यवर्धित अभ्यासक्रम, क्षमता वर्धित अभ्यासक्रम आणि बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम. प्रत्येक विद्यार्थ्याला ईआरपी आणि एलएमएस प्रदान केले जातील. आवश्यक शैक्षणिक क्रेडिट्स यशस्वीरित्या मिळवल्यानंतर, पिंपरी चिंचवड विद्यापीठाकडून डिप्लोमा प्रदान केला जाईल. हे क्रेडिट्स त्यांच्या राष्ट्रीय शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिट्स (एबीसी) मध्ये जमा केले जातील. या कार्यक्रमातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना विविध उद्योगांसाठी कुशल कामगारांच्या स्वरूपात एक चांगला स्रोत निर्माण होईल. विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी देखील निवड करू शकतात. डिसेंबरमध्ये या शैक्षणिक सत्रास प्रारंभ होईल असे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले.

क्रमिक अभ्यासक्रमाबरोबरच प्रात्यक्षिकांवर आधारित शिक्षण देण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार असून विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होण्यास मदत होईल. पर्यायाने औद्योगिक आस्थापनांना कुशल मनुष्यबळ मिळू शकेल. त्यामुळे विकसित भारताचा पाया अधिक भक्कम होईल असे नीरज अगरवाल म्हणाले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. उमेश पोतदार तर किशोर मालोकर यांनी आभार मानले.

## मोफत महाआरोग्य शिबिराला उस्फूर्त प्रतिसाद

### भाजप युमो शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या कार्य अहवाल पुस्तिकेचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते प्रकाशन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**कुदळवाडी चिखली परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरलेले मोफत महाआरोग्य शिबिर नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.सकाळपासूनच नागरिकांनी शिबिर स्थळी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध आरोग्य तपासण्या करून घेतल्या.**




दरम्यान यावेळी भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या कार्य अहवाल पुस्तिकेचे भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. याबाबत माहिती देताना यादव म्हणाले शिबिरात जनरल तपासणी, नेत्र तपासणी, रक्तदाब, मधुमेह, हाड व सांधे तपासणी, महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी तसेच दंत तपासणी आदी विविध विभागांतर्गत तज्ज्ञ डॉक्टरांनी मोफत सेवा दिली. डॉक्टरांनी नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. तसेच योग्य आहार, नियमित व्यायाम आणि स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

या शिबिराच्या निमित्ताने दिनेश यादव यांच्या कार्य अहवाल पुस्तिकेचे प्रकाशनही करण्यात आले. पिंपरी चिंचवड भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते या पुस्तिकेचे प्रकाशन संपन्न झाले. यावेळी भाजपा सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, माजी नगरसेवक कुंदन गायकवाड, संतोष मोरे, साधनाताई मळेकर, आश्विनी जाधव, योगीता नागरगोजे विकास डोळस, तसेच मधुकर बच्चे,वैशाली खाडे आदी उपस्थित होते.

**काटे यांच्याकडून कौतुक**

यावेळी शत्रुघ्न काटे यांनी दिनेश यादव यांच्या सामाजिक कार्याची प्रशंसा करताना अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्यविषयक जागरूकता वाढत असल्याचे सांगितले.शिबिराचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्थाही करण्यात आली. शिबिरात शेकडो नागरिकांनी मोफत आरोग्यसेवेचा लाभ घेतला असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## सातवी राज्यस्तरीय एल्बो बॉक्सिंग स्पर्धा

# न्यू इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश

### शिक्षण विश्व: दोन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय एल्बो बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**थेरगाव येथील न्यू इंग्लिश मीडियम स्कूल मधील विद्यार्थ्यांनी रायगड जिल्ह्यातील पेण येथे 1 आणि 2 नोव्हेंबर रोजी झालेल्या सातव्या राज्यस्तरीय एल्बो बॉक्सिंग स्पर्धेत या शाळेच्या दोन विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक पटकावले आहेत.**




स्वयंम माने याने 24 किलो खालील वजन गटात सुवर्णपदक मिळवले. तर युवराज पाटुकले याने 42 किलो खालील वजन गटात सुवर्णपदकाची कामगिरी केली. दोघांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेतील सर्व शिक्षक आणि पालक वर्गाने त्यांचे कौतुक केले.

संस्थेचे अध्यक्ष विजय पवार, सचिव अशोक मोरे, खजिनदार सुरेखा पवार, मुख्याध्यापक विद्या नाईक तसेच अग्रिस आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी या दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या दोघांची निवड येत्या 13 आणि 14 डिसेंबर 2025 रोजी सातारा येथे होणाऱ्या राष्ट्रीय एल्बो बॉक्सिंग स्पर्धेसाठी झाली आहे. दोन्ही विद्यार्थी न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नियमित सराव करतात. त्यांना यशवंत माने आणि संदीप माने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

## उत्सव आनंदाचा खेळ पैठणीचा! महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान

### प्रसिद्ध अभिनेत्री पल्लवी वैद्य प्रमुख आकर्षण : भाजपाचे राहुल काटे यांचा पुढाकार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महिला भगिनींच्या कला, गुण आणि सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी राहुल काटे यांच्या वतीने आयोजित केलेल्या विशेष स्पर्धेचा रंगारंग सोहळा ८ नोव्हेंबर २०२५ रोजी पिंपरी चिंचवड येथील पुनावळे भागात आयोजित करण्यात आले आहे. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रसिद्ध अभिनेत्री पल्लवी वैद्य (रेणुका – लक्ष्मी सिरीयल) यांची उपस्थिती प्रमुख आकर्षण आहे.**

कार्यक्रमाचे आयोजन प्रभाग क्रमांक २५, पुनावळे, ताथवडे, वाकड येथील नागरिकांच्या वतीने करण्यात आले आहे. विशेषतः, या कार्यक्रमात महिलांच्या कर्तृत्वाला आणि त्यांच्या योगदानाला सन्मानित करण्यासाठी विविध स्पर्धा, प्रदर्शने आणि पुरस्कार वितरण होणार आहे.

पल्लवी वैद्य यांच्या साक्षात्कारामुळे कार्यक्रमाला एक ग्लॅमरस वळण मिळणार आहे. 'लक्ष्मी' सिरीयलच्या लोकप्रिय रेणुका या पात्राने महाराष्ट्रातील छोट्या मोठ्या कुटुंबांमध्ये आपल्या अभिनयाची छाप सोडली आहे. त्या महिलांच्या कर्तृत्वावर लक्ष केंद्रित करणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.प्रभाग क्रमांक 25 मधील विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी पुढाकार आणि धोरणात्मक निर्णय घेतल्याबद्दल आमदार श्री. शंकरभाऊ जगताप यांचा समस्त नागरिक बंधु-भगिनींच्या वतीने जाहीर नागरी सत्कार करण्यात येणार आहे. तसेच, कार्यक्रमात विजेत्यांना दिली जाणारी आकर्षक बक्षिसे देखील कार्यक्रमाचा भाग असतील. यामध्ये टीव्ही, फ्रिज, गॅस शेगडी, मिक्सर, इलेक्ट्रिक शेगडी यांसारखी उच्च दर्जाची बक्षिसे दिली जातील. दिनांक: ८ नोव्हेंबर २०२५ (शनिवार), वेळ: सायं. ४:०० ते ८:०० , अल्पोपहार: रात्री ८:०० ते ९:३० स्थळ: सर्व्हे नं. २१, काटेचौक, काटेवस्ती, पुनावळे, पिंपरी चिंचवड येथे हा कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश महिलांच्या सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या योगदानाला मान्यता देणे आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात महिलांच्या कार्याचे विशेष सन्मान होईल. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना मान्यवर पुरस्कार देण्यात येईल. संपर्क माहिती: 8856948839 / 9764434532 या क्रमांकावर कार्यक्रमाबाबत अधिक माहितीसाठी राहुल दिलीप काटे (भा.ज.पा.) यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.



# सांगलीचा सुपुत्र शेखर रणखांबेचा मोठ्या पडद्यावर 'रुबाब'!

## 'रुबाब' 6 फेब्रुवारी 2026 रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार

। सांगली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठी चित्रपटसृष्टीत सतत नव्या विषयांवर प्रयोग होत असताना सांगली जिल्ह्याचा सुपुत्र आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेता दिग्दर्शक शेखर बापू रणखांबे आता मोठ्या पडद्यावर पदार्पण करीत आहे. त्यांचा पहिला सिनेमा 'रुबाब' हा 6 फेब्रुवारी 2026 रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार असून त्यांच्या तासगाव तालुक्यातील पेड गावात उत्साहाचे वातावरण आहे.**




शेखर रणखांबे यांचा राष्ट्रीय पुरस्कार विजेता लघुपट 'रेखा' सामाजिक आशय आणि संवेदनशील मांडणीसाठी ओळखला जातो. 'रेखा'पूर्वीचे 'पँपलेट', 'मुक' आणि 'धोंडा' हे लघुपट देश-विदेशातील अनेक महोत्सवांत झळकले. वास्तवाशी भिडणाऱ्या आणि भावनांना अचूक स्पर्श करणाऱ्या त्यांच्या खास शैलीमुळे ते मराठी सिनेसृष्टीत लक्षवेधी ठरले आहेत.

शेखर रणखांबे यांनादिग्दर्शक रवी जाधव यांनी रणखांबे यांच्या प्रतिभेवर विश्वास ठेवत 'रेखा'ची निर्मिती केली. त्यांच्या मार्गदर्शनातून प्रेरणा घेऊन रणखांबे आता झी स्टुडिओच्या माध्यमातून 'रुबाब' घेऊन येत आहेत. या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते झी स्टुडिओ असून निर्माते संजय झणकर आणि गौरी झणकर आहेत. झी स्टुडिओच्या गुणवत्तापूर्ण आणि नावीन्यपूर्ण सिनेमांच्या परंपरेत 'रुबाब'चा समावेश अभिमानाची बाब मानली जात आहे.

दरम्यान झी स्टुडिओच्या सोशल मीडिया पेजवर नुकतेच 'रुबाब'चे टायटल पोस्टर आणि रिलीज डेट जाहीर झाली आहे. पोस्टरवरून हा सिनेमा एका सांगीतिक प्रेमकथेवर आधारित असल्याची चर्चा सुरू असून प्रमुख कलाकारांची नावे अद्याप गुप्त ठेवण्यात आली आहेत. प्रेमकथा हा मराठी सिनेमातील लोकप्रिय प्रकार असला तरी रणखांबे यांचा दृष्टीकोन वेगळा असेल, असा विश्वास प्रेक्षक व्यक्त करत आहेत. सामाजिक भान, काव्यात्म मांडणी आणि संगीताचा सुरेख संगम ही 'रुबाब'ची वैशिष्ट्ये असतील, अशी अपेक्षा आहे.

### स्थानिकांचा अभिमान!



सांगलीसारख्या छोट्या शहरातून राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करून आता मोठ्या पडद्यावर पदार्पण करणारा शेखर रणखांबे हा स्थानिक कलावंत आणि रसिकांसाठी अभिमानाचा विषय ठरला आहे.'रुबाब' 6 फेब्रुवारी 2026 रोजी प्रदर्शित होणार असून मराठी प्रेक्षकांना नवा, सांगीतिक आणि भावनिक अनुभव देणारा ठरेल, अशी खात्री व्यक्त केली जात आहे.



www.rklgis.org

RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune